RELIANCE
Power

# सभासदांना सूचना

ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, एजीएमच्या सूचनेत नमूद करण्यात आलेल्या कामकाजांच्या गोष्टी करण्यासाठी रिलायन्स पॉवर लिमिटेड (''कंपनी'') च्या सदस्यांची २१वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) बुधवार दिनांक ३० सप्टेंबर २०१५ रोजी मध्याह्नी ४.०० वाजता किंवा त्यादिवशी होणारी रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडची एजीएम संपल्यानंतर लगेच, ह्यापैकी जे नंतर होईल तेव्हा, बिरला मातुश्री सभागृह, १९, न्यू मरिन लाईन्स, मुंबई- ४०० ०२०, येथे होईल.

एजीएममध्ये करण्यात येणारे कामकाज नमूद करणारी एजीएमची सूचना, ३१ मार्च २०१५ रोजीचा संक्षिप्त ताळेबंद, संक्षिप्त नफा व तोटा विवरण आणि त्या तारखेला संपलेल्या वित्तीय वर्षाचे रोखतेच्या प्रवाहाचे विवरण, त्यावरील स्वतंत्र लेखापरीक्षकांचा अहवाल आणि एकत्रित वित्तीय विवरणासह लेखापरिक्षकांचा स्वतंत्र अहवाल हे समाविष्ट असलेला संक्षिप्त वार्षिक अहवाल आणि दूरस्थ ई-मतदान प्रपत्र कंपनीच्या सदस्यांना पाठविण्यात आले आहेत.

एजीएमच्या सूचनेत नमूद केलेले कामकाजांच्या गोष्टी इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे मतदानाने करता येऊ शकते. ज्यांनी ई-मेलचा पत्ता नोंदविला आहे अशा सदस्यांना वार्षिक अहवाल आणि दूरस्थ ई-मतदान प्रपत्र इलेक्ट्रॉनिक पद्धतीने देखील पाठविण्यात आले आहेत. ज्यांनी अजून ई-मेलचा पत्ता नोंदविलेला नाही अशा सदस्यांना डिपॉझिटरीजपाशी असलेल्या इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील धारणेच्या बाबतीत त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी सहभागीद्वारा त्यांचा ई-मेलचा पत्ता नोंदविण्याची विनंती करण्यात येत आहे. प्रत्यक्ष स्वरूपात समभाग धारण करणाऱ्या सदस्यांना, कार्वी कॉम्प्युटरशेअर प्रायव्हेट लिमिटेड (''कार्वी''), कंपनीचे रजिस्ट्रार व ट्रान्सफर एजन्ट यांचेपाशी त्यांचा ई-मेलचा पत्ता नोंदविण्याची विनंती करण्यात येत आहे.

**एजीएमला उपस्थित राहण्यास आणि मतदान करण्यास पात्र सदस्य त्याच्या/तिच्या वतीने उपस्थित राहण्यासाठी आणि मतदानाच्या वेळी मतदान करण्यासाठी प्रॉक्सीची नेमणूक करण्यास पात्र आहे आणि प्रॉक्सी कंपनीचा सदस्य असण्याची आवश्यकता नाही. परंतु, प्रॉक्सीची नेमणूक करणारे दस्तऐवज वैध होण्यासाठी, एजीएम सुरू होण्याच्या ४८ तास अगोदर कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात जमा केले पाहिजेत.**

कंपन्या (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ मधील नियम २०, वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्यानुसार, आणि लिस्टिंग करारातील कलम ३५बी सोबत वाचले असता कंपनी कायदा, २०१३ (''कायदा'') मधील कलम १०८ अन्वये, कंपनी आपल्या सदस्यांना दूरस्थ ई-मतदान सुविधा उपलब्ध करून देत आहे. दिनांक २३ सप्टेंबर २०१५ (अंतिम मुदतीची तारीख) रोजी ज्या व्यक्तिंची नावे डिपॉझिटरीज यांच्यापाशी असलेल्या सदस्यांच्या रजिस्टरवर किंवा लाभधारक मालकांच्या रजिस्टरवर नोंदविली आहेत अशा व्यक्तीच फक्त दूरस्थ ई-मतदान सुविधेचा लाभ घेण्यास त्याचप्रमाणे एजीएममध्ये मतदान करण्यास पात्र असतील.

वार्षिक अहवाल पाठविण्यात आल्याच्या तारखेनंतर कंपनीची सदस्य झालेली आणि अंतिम मुदतीच्या तारखेला समभाग धारण करणारी कोणीही व्यक्ती सूचना, वार्षिक अहवालाची प्रत आणि ई-मतदान प्रपत्राची प्रत मिळविण्यासाठी आणि सभेला उपस्थित राहण्यासाठी आपला रजिस्टर केलेला फोलिओ क्रमांक/डीपी-आयडी/ग्राहक आयडी नमूद करून रजिस्ट्रार व ट्रान्सफर एजन्ट - कार्वी कॉम्प्युटरशेअर प्रायव्हेट लिमिटेड यांना विनंती पाठवू शकते.

दूरस्थ मतदान दिनांक २७ सप्टेंबर २०१५ (भाप्रवेळ सकाळी १०.०० वाजता) सुरू होईल आणि दिनांक २९ सप्टेंबर २०१५ रोजी (भाप्रवेळ सायंकाळी ५.०० वाजता) बंद होईल, त्यानंतर दूरस्थ मतदान करण्याची परवानगी दिली जाणार नाही. त्यानंतर कार्वी द्वारे दूरस्थ ई-मतदानाचे मॉड्यूल बंद करण्यात येईल. एकदा सदस्याने दूरस्थ ई-मतदान पद्धतीने ठरावा/वांवर मतदान केले की त्यानंतर त्याला/तिला नंतर ते बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही. दूरस्थ ई-मतदान वैकल्पिक आहे. मतदान करण्याच्या पद्धतीसंबंधी तपशिल एजीएमच्या सूचनेत उपलब्ध आहे, कंपनीच्या वेबसाईटवर उदा. www.reliancepower.co.in येथे प्रदर्शित करण्यात आला आहे आणि दूरस्थ ई-मतदान एजन्सीच्या वेबसाईटवर उदा. https://evoting.karvy.com येथे उपलब्ध आहे.

एजीएमला उपस्थित राहणाऱ्या आणि ज्यांनी दूरस्थ ई-मतदानाद्वारे अजून मतदान केले नाही अशा सदस्यांना इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रणेद्वारे किंवा मतपत्रिकेद्वारे किंवा मतदान प्रपत्राद्वारे मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. सदस्य दूरस्थ मतदानाद्वारे त्याचा/तिचा मतदानाचा अधिकार बजावल्यानंतर देखील एजीएमला उपस्थित राहू शकतो परंतु त्याला/तिला पुन्हा मतदान करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

संचालक मंडळाने मतदान प्रक्रियेची छाननी करण्यासाठी श्री. अनिल लोहिया, भागीदार, मेसर्स दयाळ ॲण्ड लोहिया, चार्टर्ड अकौन्टन्टस यांची स्क्रूटिनायझर म्हणून नेमणूक केली आहे.

एजीएम संपल्यानंतर तीन दिवसांच्या आत मतदानाचे निकाल घोषित करण्यात येतील आणि स्क्रुटिनायझरच्या अहवालासोबत ते कंपनीच्या वेबसाईटवर (www.reliancepower.co.in) आणि कार्वी कॉम्प्युटरशेअर प्रायव्हेट लिमिटेड यांच्या वेबसाईटवर टाकण्यात येतील आणि ते बीएसई लिमिटेड व नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड यांना कळविण्यात येतील.

कायद्यातील कलम १३६ अंतर्गत सदर दस्तऐवज मिळण्यास पात्र असलेल्या कोणाही व्यक्तीने लेखी विनंती केल्यास संपूर्ण वित्तीय विवरण आणि अहवाल असलेला संक्षिप्त आणि संपूर्ण वार्षिक अहवाल उपलब्ध होईल. ह्यासाठी सदस्याने कंपनीकडे त्यांच्या नोंदणीकृत कार्यालयाच्या पत्त्यावर किंवा रजिस्ट्रार व ट्रान्सफर एजन्ट - कार्वी कॉम्प्युटरशेअर प्रायव्हेट लिमिटेड, (युनिट: रिलायन्स पॉवर लिमिटेड), कार्वी सेलेनियम, टॉवर बी, प्लॉट क्रमांक: ३१ व ३२, सर्वे क्र.११६/२२, ११५/२४, ११५/२५, फायनान्शिअल डिस्ट्रिक्ट, नानाक्रमगुडा, हैदराबाद-५०० ०३२, तेलंगणा, भारत येथे लेखी विनंती करावी. कंपनीच्या वेबसाईटवर www.reliancepower.co.in येथे देखील संपूर्ण वार्षिक अहवाल उपलब्ध आहे.

तसेच कंपनी कायदा २०१३च्या कलम ९१च्या अनुषंगाने असेही सूचित करण्यात येत आहे की, कंपनीची सभासदांची नोंदवही आणि कंपनीच्या समभागांसाठी असलेली भाग हस्तांतरण वही शनिवार, दिनांक १९ सप्टेंबर २०१५ ते बुधवार दिनांक ३० सप्टेंबर २०१५ (दोन्ही दिवस समाविष्ट) वार्षिक सर्वसाधारण सभेनिमित्त बंद राहील.

ई-व्होटींगशी संबंधीत काही शंका किंवा तक्रारी असल्यास त्याविषयी कंपनीच्या सचिवांना नोंदणीकृत कार्यालयात कळवावे किंवा ईमेलद्वारे reliancepower.investor@relianceada.com वर पाठवावे.

रिलायन्स पॉवर लिमिटेड करिता

ठिकाण: नवी मुंबई
दिनांक: ५ सप्टेंबर, २०१५

रामास्वामी कालीदास
कंपनी सचिव

**रिलायन्स पॉवर लिमिटेड**
नोंदणीकृत कार्यालय: एच ब्लॉक, १ला मजला, धीरुभाई अंबानी नॉलेज सिटी, नवी मुंबई - ४०० ७१०.
दूरध्वनी: +९१ २२ ३०३२ ७६४८ फॅक्स: +९१ २२ ३०३२ ७७१९
ई-मेल: reliancepower.investors@relianceada.com, वेबसाईट: www.reliancepower.co.in
सीआयएन: L40101MH1995PLC084687